दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१९ ऑक्टोबर २०२५ 9422660067 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 19 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 61 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## मुंबईचा विकास आणि नागरिकांची सोय महत्त्वाची

**मुंबई**–भोंगे मुक्त मुंबई या पुस्तिकेच्या प्रकाशन सोहळ्यात किरीट सोमय्या यांनी मुंबईतील ध्वनी प्रदूषण, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम आणि प्रशासनाने घ्यायच्या उपाययोजनांवर सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्षत्व मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी केले, तर आशिष शेलार यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून पुस्तिकेचे प्रकाशन केले. मुंबई शांत, सुरक्षित आणि सर्व धर्मांचा सन्मान राखणारी ठेवायची असेल, तर आवाजाच्या प्रदूषणावर नियंत्रण आवश्यक आहे. पण काहींना भोंग्यावरून राजकारण करायचे आहे, आम्हाला मात्र मुंबईचा विकास आणि नागरिकांची सोय महत्त्वाची आहे, असे शेलार यांनी स्पष्ट केले.

# रब्बी पिकांचे क्षेत्र वाढणार-कृषी मंत्र्यांनी दिले नियोजनाचे निर्देश

## पुणे येथे राज्यस्तरीय आढावा बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता

**पुणे (वृत्तसंस्था)**

पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय रब्बी हंगाम नियोजन आढावा बैठकीत राज्याचे कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी महत्त्वाचे निर्देश दिले. रब्बी पिकाखालील वाढते क्षेत्र लक्षात घेऊन आतापासूनच बियाणे, खते आणि इतर निविष्ठांचे नियोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले. खरीप हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगाम अधिक सक्षमपणे पार पाडण्यासाठी ही बैठक वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस अपर मुख्य सचिव (कृषी) विकासचंद रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, प्रकल्प संचालक (पोक्रा) परिमल सिंग, महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालक भुवनेश्वरी, प्रकल्प संचालक (स्मार्ट) डॉ. हेमंत वसेकर, महासंचालक (महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद) वर्षा लड्ढा उपस्थित होते. याशिवाय, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक, कृषी आयुक्तालयातील अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि सर्व जिल्ह्यांतील प्रकल्प संचालक (आत्मा) यांचीही उपस्थिती होती.

बैठकीत रब्बी हंगामासाठी बी-बियाणे, खते, पाणी उपलब्धता, हवामानातील बदल आणि विविध कृषी योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, ऑगस्ट-सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम अत्यंत महत्त्वाचा ठरणार



आहे. सध्या धरणे व विहिरी पूर्ण भरल्याने पाण्याची टंचाई जाणवणार नाही. यामुळे रब्बी पिकाखालील क्षेत्र ६५ लाख हेक्टरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बियाणे, खते व निविष्ठांचे नियोजन केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.मंत्री भरणे यांनी पुढे सांगितले की, दरवर्षी राज्यात सरासरी ५७ लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांची लागवड होते. यंदा हरभरा व गहू या प्रमुख पिकांखाली ३० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र अपेक्षित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यावर्षी 'ला-नीना'च्या प्रभावामुळे थंडी तीव्र राहील, जे रब्बी पिकांसाठी अनुकूल ठरेल.कृषी समृद्धी योजनेअंतर्गत उपलब्ध निधीचा वापर करून चालू वर्षी महा डीबीटीद्वारे विक्रमी ४४.६७ लाख शेतकऱ्यांची निवड करण्यात आल्याची माहितीही कृषी मंत्र्यांनी दिली. इतक्या मोठ्या प्रमाणात लाभार्थी निवडले जाण्याची ही पहिलीच वेळ असून, या निवड झालेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.राज्य सरकारने खरीप हंगामातील नुकसानीसाठी २२१५ कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच मंजूर केला आहे. त्यानंतर ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे विशेष मदत पॅकेज आणि नुकत्याच झालेल्या नुकसानासाठी १३५६ कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे.

## लातूर अर्बन बँकेकडून कर्जधारकाच्या निधनानंतर कुटुंबाला आर्थिक हातभार

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । नदीम पटेल**

अल्पावधीतच प्रगतीपथावर असणाऱ्या लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने सामाजिक बांधिलकी जोपासत कर्जधारकाच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिली आहे. बँकेच्या विमा योजनेअंतर्गत मृत कर्जधारकाचा दावा मंजूर करण्यात आला असून त्याची रक्कम त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करण्यात आली.बँकेच्या उदगीर शाखेचे कर्जदार स्व. विश्वनाथ ताडकोळे हे एका आश्रमशाळेत शिक्षक पदावर कार्यरत होते त्यांनी बँकेकडून पगारतारण कर्ज घेतले होते, दुर्दैवाने त्यांचे अपघाती निधन झाले या प्रकरणी बँकेने काढलेल्या विमा पॉलीसी चा दावा मंजूर होऊन कर्ज रक्कम बेबाक होऊन वारसाला देखील ५ लाख मृत्युलाभ रक्कम

देण्यात आली आहे. बँकेने दिलेला हा आर्थिक हातभार कुटुंबासाठी मोठा आधार ठरला असून, वारसदारांच्या चेहऱ्यावर दिलासा दिसून आला. अशाच प्रकारे बँकेच्या अंबाजोगाई रोड, लातूर शाखेतील कर्जदार स्व. संजय मन्मथ शेटे यांचा देखील बँकेने काढलेल्या विमा पॉलीसी चा दावा मंजूर होऊन त्यांचे उर्वरित कर्ज बेबाक होऊन त्यांच्याही वारसाला ५ लाख मृत्युलाभ रक्कम देण्यात आली आहे. शेटे कुटुंबीयांनी

ही बँकेचे खूप खूप आभार व्यक्त केले आहेत.



अशा अचानक ओढवणाऱ्या संकटांना टाळता येत नाही परंतु कर्जदारांनी स्वतः हून आपापल्या कर्जांना विम्याचे कवच प्रदान करावे जेणे करून मानसिक व आर्थिक अशा दोन्ही संकटांचा बोझा आपल्यानंतर आपल्या कुटुंबावर पडणार नाही या पद्धतीचे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रदीपजी राठी, विद्यमान अध्यक्ष श्री. आकाशजी राठी यांनी केले आहे. या वेळी बँकेचे उपाध्यक्ष सीए श्री. लक्ष्मीरमणजी मालू, सर्व संचालक उपस्थित होते. अशी माहिती व्यवस्थापकीय संचालक श्री. नवनितजी भंडारी यांनी दिली.लातूर अर्बन बँक नेहमीच ग्राहककेंद्रित सेवा देत असून, गरजु कुटुंबांना मदतीचा हात देणे ही बँकेची परंपरा कायम राहिली आहे

## आरक्षण रद्द होण्याच्या भीतीने मराठा युवकाची आत्महत्या; बीडमध्ये खळबळ

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, या भीतीने बीड तालुक्यातील वरवटी येथील एका २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल (दि. १८) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन शासनाने दिलेल्या आरक्षणावर नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यातून प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच नैराश्यातून विष्णु कोटुळे याने टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे.



नेमके काय घडले?

वरवटी येथील रहिवासी असलेला विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे (वय २३) या युवकाने काल दुपारी ५ वाजेच्या सुमारास घरात गळफास लावून घेतला. मराठा समाजाला 'हैदराबाद गॅझेट'नुसार मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, तसेच बीड येथील नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यामुळे आरक्षणावर विपरीत परिणाम होईल, या चिंतेतून त्याने हे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे.

आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीतील मजकूर हृदयद्रावक विष्णु कोटुळेच्या खिशात पोलिसांना एक चिठ्ठी मिळाली आहे. त्यामध्ये त्याने आत्महत्या करण्याचे स्पष्ट कारण नमूद केले आहे. चिठ्ठीत त्याने लिहिले आहे की, मराठा समाजाला कुणबी म्हणून शासनाने काही दिवसापूर्वी जीआर काढला होता, परंतु काल बीडला झालेल्या ओबीसीच्या महायलगार मेळाव्यामुळे मराठा समाजाला दिलेला जीआर (आरक्षण) रद्द होणार व पुन्हा आम्हाला नोकरी मिळणार नाही या नैराश्यातून मी आज आत्महत्या करत आहे.पुढे त्याने आपल्या समाजासाठी अत्यंत कळकळीची मागणी केली आहे. तो म्हणतो, माझा मराठा समाज खूप गरीब आहे, मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकले नाही तर माझ्यासारखे अनेक मराठा बांधव आत्महत्या करतील. आरक्षण टिकणार की नाही या भीतीने एका तरुण मराठा युवकाने आपले जीवन संपवल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचे दर्शन घडवले आहे. या घटनेबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

## औशात लॉजवर वेश्याव्यवसाय; पोलिसांची धाड; दोन जण ताब्यात



दैनिक वादळ वार्ता । **औसा । खालेद काझी**

औसा शहरातील तुळजापूर टी- पॉईंट जवळील ए-वन लॉज येथे अनैतिक देहविक्री वेश्या व्यवसाय प्रकरणी पोलिसांनी धाड टाकून दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३ (५) २०२३ सह अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई दि. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ०० वाजता करण्यात आली.यावेळी अशोक शिवशरणाप्पा करपे (वय ५५ वर्ष, रा. गरुड चौक, लातूर) आणि अर्जुन दयानंद फावडे (वय २९ वर्ष, रा. नागरसोगा, ता. औसा) हे दोघे अनैतिक देहविक्रीसाठी महिलांना लॉजमध्ये ठेवूनग्राहकांकडून २००० रुपये घेत असल्याचे आढळून आले. त्यात लॉज व्यवस्थापक स्वतःसाठी ५०० रुपये, लॉज मालक ८०० रुपये आणि पीडित महिलेला ७०० रुपये अशा प्रकारे पैसे वाटून घेत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथील पोलीस हवालदार सुधामती गणेश यादव यांच्या फिर्यादीवरून गु, र.नं. ४१२/२०२५ असून, तपास पोलीस निरीक्षक रेवणनाथ डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कारवाईमुळे चालणाऱ्या लॉजच्या आडून बेकायदेशीर वेश्या व्यवसायावर वचक बसण्याची शक्यता आहे.

## कोळदे व पातोंडा गटात विकासकामांचे लोकार्पण समस्या निवारणासाठी नागरिकांशी थेट संवाद

### शिवसेनेला मिळणारा जनतेचा पाठिंबा हेच आमचे खरे बळ-आ.चंद्रकांत रघुवंशी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हा परिषद गट कोळदे आणि पातोंडा येथील नागरिकांसाठी लोकोपयोगी विकासकामांचे लोकार्पण आणि थेट जनतेशी संवाद साधण्याचा कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आ. चंद्रकांत रघुवंशी व शिवसेना जिल्हाप्रमुख ड. राम रघुवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या दोन्ही गटातील जनतेच्या गरजेनुसार पूर्ण करण्यात आलेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण या वेळी करण्यात आले. या कामांमुळे परिसरातील नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये वाढ होणार असून, गावांच्या विकासाला नवी गती मिळाली आहे. या लोकार्पण सोहळ्याला स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. विकासकामांच्या




उद्घाटनानंतर उपस्थित प्रमुख नेत्यांनी कोळदे व पातोंडा गटातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. या वेळी जनतेच्या स्थानिक समस्या, गरजा आणि अपेक्षा जाणून घेण्यावर विशेष भर देण्यात आला. जनतेने मांडलेल्या अनेक समस्यांचे निवारण या भेटीदरम्यान त्वरित करण्यात आले, ज्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या वेळी बोलताना आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी स्पष्ट केले की, जनतेकडून शिवसेनेला मिळणारे प्रेम, पाठिंबा आणि विश्वास हेच आमचे खरे बळ आहे. त्यांनी पुढे सांगितले की, शिवसेना हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर तो जनतेचा भक्कम विश्वास आहे. विकासासाठी आणि जनतेच्या हक्कासाठी शिवसेना नेहमीच कटिबद्ध आहे आणि आम्ही नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करत राहू.जनतेच्या भेटीगाठींच्या माध्यमातून थेट संवाद साधल्याने, स्थानिक पातळीवरील समस्यांची अचूक माहिती मिळाली असून, त्यांच्या निराकरणासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिले.


SMKD Education Society's

**MKD College of Nursing Virchak, Nandurbar**

Near Navapur Road, Virchak Shivan Phata, Nandurbar-425412
Tel.-8390452335, 9538938092 Email: mkdbscnursing@gmail.com

**ADMISSION FOR VACANT SEATS**

(For Academic Year 2025-26 Institute level Round)

**For B.Sc. Nursing (4 Years Degree)**

(Reference No.: State CET Notice No.: MED-1025/C. R. No. 15/B.Sc. Nursing/ CAP-4 & Insti. Round/3087 dated: 06/10/2025 and Notice No. 18

With reference to seat matrix against Vacant seats as published by State CET Cell ON 17/10/2025, application are invited from eligible & interested candidates for admission to 1st Year B.Sc. Nursing for Institute Level round on Inter-se merit for academic year 2025-26.

The state CET cell notice is displayed on their website www.mahacet.org

**Principal**
MKd College of Nursing
Virchak, Nandurbar

**Secretary**
SMKD Eudcation Society's
Virchak, Nandurbar

संपादकीय

# शुद्ध हवेचा हक्क

नेदरलँडमधील हेगस्थित आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ( खउग ) २३ जुलैला हवामान बदलासंदर्भात राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांबाबत एक ऐतिहासिक मत नोंदवले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मागितलेल्या मताबद्दल निकाल देत न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की पृथ्वीच्या हवामान प्रणालीचे संरक्षण करणे ही सर्व देशांची कायदेशीर जबाबदारी आहे. महासभेने न्यायालयाला दोन मूलभूत प्रश्न विचारले होते: पहिला, हरितगृह वायूंच्या मानवनिर्मित उत्सर्जनापासून हवामान प्रणाली आणि पर्यावरणाच्या इतर बाबींचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत देशांच्या जबाबदाऱ्या काय आहेत? आणि दुसरा, या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर परिणाम काय असतील?या निर्णयात न्यायालयाने अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. प्रथम, पॅरिस करारातील सहभागी देशांनी जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना करणे बंधनकारक आहे. दुसरे, प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या योगदानाची (छऊꣳ) पूर्तता करणे आवश्यक आहे. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे हवामान प्रणालीला होणाऱ्या हानीसाठी देश जबाबदार धरले जाऊ शकतात. जीवाश्म इंधनाचे उत्पादन, वापर, व त्याच्या उत्खननासाठी परवाने देणे किंवा अनुदान देणे यांसारख्या कृतींमुळे हवामान बदल रोखण्यात अपयश आल्यास ते आता आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरू शकते. विशेष म्हणजे, न्यायालयाच्या इतिहासात केवळ पाचव्यांदाच सर्व न्यायाधीशांनी एकमताने निर्णय दिला आहे. या प्रक्रियेत तब्बल ९६ देश आणि ११ आंतरराष्ट्रीय संस्थांनी भाग घेतला, हा न्यायालयाच्या इतिहासातील सर्वाधिक सहभाग आहे.न्यायालयाच्या निकालात श्रीमंत विकसित राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. णछऋउउउ च्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या देशांवर हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यात पुढाकार घेण्याची अतिरिक्त जबाबदारी आहे. विकसित देशांच्या यादीमध्ये अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आणि इतर विकसित राष्ट्रांचा समावेश आहे, न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की या राष्ट्रांनी केवळ आपले हरितगृह वायू उत्सर्जन मर्यादित करणेच नव्हे तर हरितगृह वायू शोषक आणि संचयकांमध्ये वाढ करणे देखील आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने या श्रीमंत राष्ट्रांवर आर्थिक सहाय्य, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण याच्या माध्यमातून विकसनशील देशांना मदत करण्याची बंधनकारक जबाबदारीही निश्चित केली आहे. ही सर्व सहकार्ये 'सद्भावनेने' करणे अनिवार्य आहे. केवळ कागदोपत्री आश्वासने न देता आता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ही मदत कर्जाच्या रूपात देण्याची जी प्रथा श्रीमंत देशांकडून चालू होती, त्यावरही आळा बसेल अशी आशा आहे.

**बेट राष्ट्रे आणि विकसनशील देशांसाठी महत्त्व**

बेट राष्ट्रे आणि विकसनशील देशांसाठी हा निकाल विशेष महत्त्वाचा आहे. भौगोलिक परिस्थिती आणि विकासाच्या पातळीमुळे जे देश हवामान बदलाच्या दुष्परिणामांना अधिक बळी पडतात किंवा विशेषतः असुरक्षित आहेत, त्यांना इतर देशांप्रमाणेच कायदेशीर उपाय उपलब्ध असल्याचं न्यायालयाने अधोरेखित केलं.पॅसिफिक महासागरातील वानुआतु, तुवालू, किरिबाती यांसारख्या छोट्या बेट राष्ट्रांसाठी हा निकाल अक्षरशः जीवन-मरणाचा प्रश्न आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे या देशांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या राष्ट्रांना श्रीमंत औद्योगिक देशांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी आवश्यक ठोस आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने मान्य केले की या देशांनी हवामान बदलात नगण्य योगदान दिले असूनही त्यांना सर्वाधिक फटका बसत आहे. बांगलादेश, मालदीव, फिलिपाइन्स यांसारख्या विकसनशील देशांसाठी देखील हा निकाल आशेचा किरण आहे. त्यांना आता नुकसान भरपाई, आर्थिक मदत आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने स्पष्ट केले की 'विशेषतः प्रभावित' किंवा 'विशेषतः असुरक्षित' राष्ट्रांना इतर देशांप्रमाणेच समान उपाय मिळण्याचा हक्क आहे.

**खासगी कंपन्यांवरील नियंत्रणाची आवश्यकता**

न्यायालयाच्या निकालातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे खासगी क्षेत्रावरील राष्ट्रांच्या जबाबदारीचे स्पष्टीकरण. न्यायालयाने ठामपणे सांगितले की प्रत्येक देशाने आपल्या अधिकार क्षेत्रातील खासगी कंपन्यांच्या उत्सर्जनावर प्रभावी नियंत्रण ठेवणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. याचा अर्थ असा की, आता राष्ट्रे केवळ 'कंपन्या स्वतंत्र आहेत,' असे म्हणून आपली जबाबदारी टाळू शकत नाहीत. उदाहरणार्थ, जर एखाद्या देशातील तेल कंपनी, कोळसा खाण किंवा सिमेंट कारखाना मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन करत असेल, तर योग्य कायदे, नियम आणि मर्यादा लागू करून हे उत्सर्जन नियंत्रित करणं ही त्या देशाची जबाबदारी असेल. न्यायालयाने स्पष्ट केले की योग्य नियंत्रक उपाययोजना न केल्यास हे राष्ट्राच्या 'योग्य काळजी' ( वींश वळश्रळसशपलश ) घेण्याच्या कर्तव्यात अपयश मानले जाईल आणि त्यासाठी संबंधित राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर जबाबदार धरले जाईल. या निर्णयामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना नियंत्रित करण्यासाठी देशांवर अधिक दबाव येणार आहे आणि 'कॉर्पोरेट क्लायमेट रिस्पॉन्सिबिलिटी' ही संकल्पना अधिक बळकट होणार आहे.

**भारतासाठी या निकालाचे महत्त्व**

भारतासाठी हा निकाल अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. जगातील तिसरा सर्वाधिक कार्बन उत्सर्जक देश असूनही, भारताचे दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. न्यायालयाने 'समान पण भिन्न जबाबदाऱ्या आणि संबंधित क्षमता' या तत्त्वाला दिलेल्या महत्त्वामुळे भारताल विकासात्मक गरजा आणि हवामान कृती यांचा समतोल साधण्यास मदत मिळेल. विशेष म्हणजे, भारताला आता विकसित देशांकडून हवामान वित्त, स्वच्छ तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण यासाठी अधिक ठामपणे मागणी करता येईल. गेल्या वर्षी कॉन्फरेन्स ऑफ पार्टिस परिषदेत विकसित देश स्वतःची हवामान बदलासंदर्भात नुकसानभरपाई देण्याच्या जबाबदारीकडे लक्ष न देता भारतासारख्या विकसनशील देशांकडे बोट दाखवत त्यांनीही गरीब राष्ट्रांना पैसे पुरवावेत, अशी मागणी करत होते. परंतु, आता या निकालातून ऐतिहासिक उत्सर्जन आणि दरडोई उत्सर्जन विचारात घेत देशांवरील जबाबदारी स्पष्ट करण्यात मदत होईल. दुसरीकडे, भारतात वाढत चाललेली कोळसा आधारित वीजनिर्मिती, वाढते औद्योगिक उत्सर्जन आणि खासगी क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या उत्सर्जनावरील नियंत्रण या बाबतीत भारतावरही दबाव वाढणार आहे.हिमालयातील हिमनद्या वितळणे, मान्सूनचे बदलते स्वरूप व त्यातून वारंवार येणारे पूर आणि दुष्काळ यांसारख्या समस्या त्यामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि जमिनीचे नुकसान, किनारपट्टीवरील शहरांना समुद्र पातळी वाढीचा धोका या गंभीर समस्यांना तोंड देत असलेल्या भारतासाठी हा निकाल श्रीमंत देशांकडून नुकसान भरपाई मिळविण्यासाठी नवीन मार्ग उघडतो. तसेच भारताने २०७०पर्यंत नेट झिरो उत्सर्जनाचे लक्ष्य ठेवले आहे, परंतु या निकालानंतर हे लक्ष्य अधिक महत्त्वाकांक्षी बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढू शकतोया निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. आता कोणताही देश हवामान बदलाच्या जबाबदारीतून सुटू शकणार नाही. हवामान न्यायासाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी आणि भावी पिढ्यांसाठी हा निकाल एक महत्त्वाचा विजय मानला जात आहे.

# खरी डिजिटल साक्षरता



विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताने कम्प्युटर युगात पहिले पाऊल टाकले तेव्हा सर्वसामान्यांना कम्प्युटर ही गोष्ट गूढ आणि जणू जादूच वाटायची. 'बटण दाबल्यावर काहीतरी बिघडेल' अशी भीती मनात असायची. परंतु आता कम्प्युटर हे केवळ यंत्र राहिलेले नाही. ते माणसाच्या विचारविश्वात शिरले आहे. अर्थात, ही वाटचाल एक दिवसात घडलेली नाही.

विसाव्या शतकाच्या अखेरीस, कम्प्युटरविषयी जनसामान्यांमध्ये असणारी अनामिक भीती, शंका, आणि संकोच दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एमएस-सीआयटी हा कम्प्युटर साक्षरतेचा मूलभूत अभ्यासक्रम सुरू केला. हा अभ्यासक्रम म्हणजे ग्रामीण ते शहरी, शिक्षक ते नोकरदार, तरुण ते गृहिणी, सर्वांसाठी एक नवा अध्याय होता. कोकणातील एखादा शिक्षक, छत्रपती संभाजीनगरमधील शेतकऱ्याचा मुलगा, नागपूरमधील घरकाम करणारी महिला, पुण्यातील छोटा व्यापारी – सगळ्यांनी कम्प्युटर शिक्षणाच्या या प्रवासात पहिले पाऊल टाकले. कम्प्युटरला बिचकणारा समाज आता आत्मविश्वासाने त्याच्या कळा दाबू लागला. त्या काळात डिजिटल साक्षर ही ओळखच प्रतिष्ठेची बाब होती.परंतु, आता आपण एका नवे वळण घेतले आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केवळ साधन म्हणून नसून, निर्णय घेण्याच्या क्षमतेशी जोडला गेला आहे. कृत्रिम प्रज्ञा (एआय), मोठ्या प्रमाणावर भाषिक विश्लेषण करणारी उपकरणे, चॅटजीपीटी आणि ध्वनिचित्र विश्लेषण, हे सारेच शिक्षणात प्रवेश करत आहेत. पण हे करताना आपण मूलभूत प्रश्न विचारायला हवा – आपली शिक्षणव्यवस्था या बदलांसाठी मानसिक, बौद्धिक आणि व्यावहारिकदृष्ट्या सज्ज आहे का? शाळा-महाविद्यालयांमध्ये कम्प्युटर विषय असतो, पण त्या विषयाचे शिक्षण देणारा शिक्षक नसतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कम्प्युटर लॅब आहे, पण त्याचा स्विच क्वचितच चालू होतो. शहरी कॉलेजांत आधुनिक फळ्यांवर चित्रफिती दाखवल्या जातात, पण त्या मागे संकल्पना स्पष्ट करणारा शिक्षकच अस्पष्ट असतो. म्हणजे आपण साधने घेतली, पण संकल्पनांमध्ये कमकुवत राहिलो. याच काळात विद्यार्थ्यांच्या हातात मोबाइल आला, डेटा आला, आणि इंटरनेटवरची सर्व माहिती सहज उपलब्ध झाली. पण ही माहिती त्यांच्या विचारक्षमतेला पोषक ठरत आहे का? की केवळ 'तयार उत्तर' मिळवून, न विचार करता स्वीकारायची सवय त्यांना लागली आहे?

आज शाळा, कॉलेजांत ऑनलाइन शिक्षण, 'कम्प्युटर शिक्षण' आदी घोषवाक्ये सतत ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्षात शिक्षकांना शासनाच्या 'दिक्षा', 'स्वयं', 'पीएम ई-विद्या' यांसारख्या व्यासपीठांची माहिती आहे का? ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी, मोबाइल डेटा, स्मार्टफोन, कम्प्युटर अक्षरज्ञान हे अजूनही आव्हान आहे. शहरांमध्येही ही स्थिती फारशी वेगळी नाही. अनेक शिक्षक कम्प्युटर शिक्षणावर विश्वास ठेवतात, पण प्रत्यक्षात त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात मागे पडतात. दुसरीकडे, विद्यार्थी वर्ग अधिक डिजिटल झाला आहे, परंतु अधिक अभ्यसनशील, विचारशील वा सर्जनशील झालेला नाही. माहितीचा स्फोट झाला असला तरी ज्ञाननिर्मितीचे प्रमाण घटले आहे. याला कारण ठरत आहेत चॅटजीपीटीसारखी साधने... जी उत्तरे तयार करून देतात. अशा साधनांचा वापर होणे चुकीचे नाही, पण त्यांच्यावर अवलंबून राहणे चुकीचे आहे. एका नामांकित कॉलेजात असेच घडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अभ्यास प्रबंधाची भाषा, संरचना आणि उदाहरणे इतकी उच्च प्रतीची होती, की ती त्या विद्यार्थ्यांच्या पातळीला शोभणारीच नव्हती. चौकशीनंतर समजले की, सर्व प्रबंध एआय साहाय्यकाद्वारे तयार केलेले होते. हे पाहून शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना दोषी ठरवले, पण खरा दोष कोणाचा? शिक्षणपद्धतीने त्यांना हे साधन कसे वापरायचे हे शिकवले नव्हते. शिक्षकांनाही याची माहिती नव्हती, प्रशिक्षण नव्हते. आज शिक्षण फक्त 'माहिती देणे' इतकेच मर्यादित राहिले आहे का? शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट चिंतन, चर्चा आणि चिरंतन जिज्ञासा नाही का? विद्यार्थ्याला जर कुतूहलच नसेल, तर मग त्याला डिजिटल यंत्रातून आलेली उत्तरे फक्त 'आशय' देतील, अर्थ नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ कम्प्युटर साधन नाही, तर विचारप्रक्रियेवर परिणाम करणारे शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण क्षेत्रात या साधनांचा उपयोग करताना नैतिकता, संदर्भाधारित समज, माहिती विश्वसनीयतेचा अभ्यास, आणि सर्जनशीलतेची वृद्धी याचा विचार करणे आवश्यक आहे. या सर्व पैलूंमध्ये ग्रंथपालांची भूमिका केवळ पूरक नव्हे, तर केंद्रीय ठरते. ग्रंथपाल हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापक नसतात; ते माहितीचे सूत्रधार, संशोधन मार्गदर्शक, संदर्भ चित्रीकरणाचे तज्ज्ञ, आणि माहिती साक्षरतेचे शिक्षक असतात. आज एआयसारख्या प्रणाली शैक्षणिक जगतात झपाट्याने प्रवेश करत असताना, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या प्रणालींचा जाणीवपूर्वक, विवेकपूर्ण आणि नैतिक वापर शिकवण्याची जबाबदारी ग्रंथपालांवर येते. विद्यार्थ्यांना चॅटजीपीटीसारख्या प्रणालींपासून आलेली माहिती कोणत्या स्रोतावर आधारित आहे, ती विश्लेषणात्मक आहे की नाही, तिचा बौद्धिक संपदा हक्क (कॉपीराइट) काय आहे, हे समजून घेण्यासाठी ग्रंथपालांचे मार्गदर्शन अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे शिक्षकही शिक्षण साहित्य तयार करताना योग्य संदर्भ शोधणे, विश्वासार्ह माहितीचे मूल्यांकन करणे, वाचनयादी बनवणे आणि आंतरराष्ट्रीय शोधनैतिक नियम पाळणे या सर्व बाबतीत ग्रंथपालांकडून सशक्त मदत घेऊ शकतात.त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी ग्रंथपालांना पारंपरिक चौकटीत अडकवून न ठेवता, त्यांना डिजिटल व एआय युगाच्या 'माहिती नेत्यां'सारखी भूमिका द्यायला हवी. प्रशिक्षण, धोरणनिर्मितीतील सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत त्यांना सक्रिय स्थान देणे ही केवळ गरज नसून, शिक्षणाच्या उज्वल भवितव्यासाठीची अपरिहार्यता आहे.

केवळ कम्प्युटर उघडणे, वापरणे किंवा संदेश पाठवणे एवढीच साक्षरता मर्यादित आहे. माहिती कोणती योग्य? तंत्रज्ञानाचा वापर नैतिक आहे का? कम्प्युटर हे साधन आहे, की पर्याय? निर्णय घेताना कृत्रिम बुद्धिमत्तेवर किती विसंबायचं? याबाबत जी विश्लेषण करते ती खरी डिजिटल साक्षरता. उल्लेख केलेल्या या प्रश्नांची उत्तरे आपल्या शिक्षणसंस्थांनी द्यायला हवीत. शिक्षकांना नियमित तांत्रिक प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांना त्याचा सर्जनशील व विवेकाधिष्ठित वापर शिकवला गेला पाहिजे. आणि शासनाने 'डिजिटल साक्षरता' ही केवळ घोषणा म्हणून न मांडता, ती एक सामाजिक गरज म्हणून ओळखून तिची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करायला हवी.आज आपण कम्प्युटर शिक्षणाच्या दुसऱ्या पर्वात प्रवेश करत आहोत. पहिले पर्व एमएस-सीआयटीचे होते. त्यात कम्प्युटर हाताळण्याचे कौशल्य मिळाले. पण दुसरे पर्व हे कृत्रिम प्रज्ञा, माहिती विश्लेषण आणि नैतिक वापराच्या शाश्वत मूल्यांवर आधारित असायला हवे. शिक्षण हे केवळ माहिती देणारे नसावे. ते विचार देणारे, प्रश्न विचारायला लावणारे आणि समाज घडवणारे असावे. जर आपण शिक्षणाचे हे मूलभूत उद्दिष्ट विसरलो, तर तंत्रज्ञानाच्या भूलथापांमध्ये आपले ज्ञान हरवून बसेल. आपण तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे, पण त्याचा उचित वापर, सतत प्रशिक्षण, शिक्षकांची सजगता आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी हाच खरा 'डिजिटल भारत' घडवणारा मार्ग आहे.

# कायद्याच्या हातांपलीकडचे!



महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही.एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे.

ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. 'हे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाही' असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात.आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ' अदखलपात्र गुन्हा ' अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके.मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते.सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वांदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही. मग जागेचा, ठिकाणाचाही प्रश्न नाही; कारण असे वर्तन उद्या मंत्रालयातील, विधिमंडळातील व विश्रामगृहातील वा खासगी उपाहारगृहात केले तरी कुठलीच कारवाई करता येणार नाही वा होणार नाही. जे आमदार निवासाच्या आवारात चालते तेच शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांत चालवावे लागेल. मनाजोगे उत्तर किंवा अपेक्षित खुलासा मिळत नसतो तेव्हा शाई फेकणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात.एकदा का आपला पक्ष व आपले कार्यकर्ते, आपली 'युती' व 'आघाडी'तील साथीदार व सहकारी यांना मोकळे रान देण्याचे ठरले की मग पक्ष पातळीवरही कारवाई करता येणार नाही. शिस्तभंग सत्तेवरील सहकारी पक्षाच्या नेत्याचा असेल तर मी काहीच करणार नाही; कारण असे माझ्या पक्षाच्या बाबतीत घडले तर मग हालचाल करावीच लागेल. युती-आघाडीचा हा धर्म सत्ताधारी व विरोधक दोघेही पाळतात व पाळतील. याला लोकांचाही आक्षेप नाही असे म्हणायचे, कारण ते आम्हाला वारंवार निवडून देतात. पुढारी हे विसरतात की निवडून मतदार देतात. लोक / जनता त्यांच्या पलीकडेही असते. 'लाडका' किंवा 'लाडकी' असे काही नसते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की 'निवडणुकीतले यश हा घाण झाकण्याचा किंवा सत्ताउपभोगाचा परवाना नव्हे.' (शिवनंदन पासवान वि. बिहार सरकार (१९८३) १ सुप्रीम कोर्ट केसेस ४३८ परिच्छेद २०). लोकांना कस्पटासमान समजायचे असे ठरविल्यावर बेताल, बेजवाबदार वर्तनाला व वक्तव्याला कारणीभूत असलेल्यांना काढण्याचा प्रश्नच नाही. मग गंभीर आरोप असलेल्यांनाही सुरक्षित ठेवावे लागते.

सारांश काय की, वेगळा पायंडा पाडला तर पंचाईत होईल. पत गेली तरी सत्ता टिकविण्याची अपरिहार्यता विधिमंडळाची, आपल्या राज्याची प्रतिमा डागाळेल याचेही वैषम्य वाटत नाही. हीच खरी शोकांतिका.

# समृद्धीसाठी अस्तंबा शिखराच्या दिशेने पडली पावले!

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

अवघ्या भारतात पसरलेल्या पर्वतामध्ये सातपुडाही एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. मध्य भारतात असून हा पर्वत गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगढ या राज्यांना जोडतो. याच सातपुड्याच्या चौथ्या रांगेत अस्तंबा हे ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी लाभलेले शिखर आहे. या शिखरावर अनादी कालापासून आश्विन आमावस्येला मोठी पुजाविधी होते. ही विधी सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या आदिवासी बांधव रुढी परंपरेनुसार करीत आला आहे. या परंपरेला अनुसरुनच पुजाविधीला यंदाही सातपुड्यातील आदिवासी बांधवांना प्रतिक्षा लागली होती. खरं तर आदिवासीमध्ये आश्विन महिन्याच्या सुरुवातीला विविध उत्सव तथा पुजाविधीना सुरुवात झाली, या महिन्याच्या सुरुवातीलाच(पौर्णिमेला) आदिवासींनी नवाय हा उत्सव साजरी केला. नवायच्या अखेरच्या दिवशी आदिवासींमधील पुर्वज व काही राजांनी सुरु केलेला दसराही मनवला. या बाधवांमध्ये नऊ दिवसाची नवाय, दहा दिवसांचा दसरा व वीस दिवसाची दिवाळी हे प्रचलित वाक्य सातत्याने उच्चारले जाते. तसे यंदाही प्रत्येकाच्या तोडून हे वाक्य उच्चारले जात आहे. आश्विन पौर्णिमेला नवायला सुरूवात करुन पौर्णिमेच्या दहाव्या दिवशी दसरा साजरा केल्यानंतर वीस दिवसांनी दिवाळीही साजरी होत आहे. यावरून आदिवासींमध्ये कालगणनाही चंद्राच्या आकारावरुन केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

अस्तंबा शिखरावरील दिवाली पुजा प्रत्येक आदिवासी कुटुंबामार्फत केली जाते. प्रामुख्याने या पूजेसाठी अस्तंबाकडे जाणारा व्यक्ती हा कुटुंबातील कर्ता व्यक्ती असतो. त्या व्यक्तीला पूजेसाठी आवश्यक असणारे व्रत (पालनी) पाळावे लागतात. हा व्यक्ती दिवालीपुर्व किमान सव्वा महिने आधी पवित्र स्नान करतो. या पालनी कालावधीत या व्यक्तीला महिलांच्या स्पर्श, खाटावर बसणे, दगड फेकून मारणे, कुसंगत करणे, वाईट विचार करणे या बाबी टाळाव्या लागतात. एवढेच नव्हे तर त्या व्यक्तीला भोपळ्याचे सेवन करणेही टाळावे लागत असल्याचे म्हटले जाते. शिवाय त्या व्यक्तीला सव्वा महिन्याच्या कालावधीत सुरुवातीची पवित्र स्नान करतांना अंथरुण-पांघरुण, अन्य कपडे व जेवणाची भांडीदेखील स्वच्छ करावी लागते. या वस्तू सव्वा महिनाभर त्या व्यक्तीशिवाय अलिप्तच ठेवावी लागतात. पूजेसाठी निघतांना संपूर्ण साहित्यांची जुळवाजुळव त्याच व्यक्तीने करावी अशी काही पालनीची पथ्ये पाळावी लागतात. अस्तंबा शिखरावर दीपोत्सव कालावधीत होणार्या पुजेला दिवाळीची पुजा म्हटले जाते. या पुजेला आदिवासी बांधवांमध्ये डोगोअं दिवालीची पुजा म्हटले जाते. ही पुजा सुरु झाल्यापासून महाराष्ट्राशिवाय गुजरात, मध्यप्रदेशातून हजारो भाविकांची पावले अस्तंबा शिखराकडे पडू लागली आहे. भाविकांचा ओघ वाढत चालल्यामुळे हिच डोगोअं दिवाली यात्रा ठरविली गेली मात्र हि यात्रा नसून आजही दिवालीच आहे. हि पुजा केवळ एखाद्या देव-देवतेप्रती केली जात नसून हवा, पाणी, सुर्यप्रकाश व अन्न या निसर्गातील घटकांची पुजा होते. परंपरेनुसार अस्तंबा शिखरावरील



पूजेसाठी नव्या अन्नाचे कण, दोरखंड, रोशा गवत प्रवर्गातील एका वनस्पतीची मुठभर मोडी सोबत नेली जाते. अस्तंबा शिखरावरील हि पुजा मायभूवर असलेले समस्त मानव, पशु-पक्षी यांच्यासह प्रत्येक जिवजंतू, जल-जंगल यांच्या भरभराटीसाठी केली जाते. त्यामुळे अवघ्या जगाच्या कल्याणासाठीच प्रार्थना केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. म्हणूनच या पूजेसाठी केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगढ मधूनही भाविक दाखल झाले आहे.आज अस्तंबा शिखराला मोठे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले, म्हणून अस्तंबा शिखर अगदी अवघड असूनही ते सर करतांना फारसा थकवा जाणवत नाही. शिवाय कुठलेही अनुचित घडत नसल्याचे म्हटले जाते. अस्तंबा शिखरावर जाण्यासाठी असली, पाडली, नकट्यादेव व चांदसैली या गावावरुन मार्ग आहे. असली व पाडलीकडून शिखराच्या स्थानकापर्यंत जाण्यासाठी रस्ता आहे, परंतु नकट्यादेव व चांदसैलीवरुन जातांना मात्र पायवाटेचाच पर्याय आहे. रस्ता व पायवाटेने शिखराकडे जाणारा प्रत्येक भाविक स्थानकात प्राथमिक पुजाविधी करतो. त्यानंतर शिखराच्या दिशेने वाटचाल करतांना रस्त्यात लागणार्या उगलकुंडीत(पाण्याचे कुंड) येथे पवित्र स्नान केल्याशिवाय कुठल्याही भाविकाला मार्गस्थ होता येत नाही. त्यामुळे प्रत्येक भाविक हि पवित्र स्नान करित आहे. तेथून पुढे जातांना रस्त्यात डोकीअं डोण (मोठा दगड) हे या दिवाली पुजेतील दुसरे पुजेचे ठिकाण असून याची भावभक्तीत पुजा होत आहे. त्यानंतर येणारे हाकडाथेवा ( निवडुंग वर्गीय वनस्पती) घसरणी, यासह देवस्थानावरही पुजा केली जात आहे. त्यानंतर पुजेचे मुख्य ठिकाणी भाविक दाखल होत आहे. तेथे भाविक आदिवासी समाजातील कथाकार, इतिहासकार (आदिवासींमधील मोडवी) व पुजारा यांच्यामार्फत पुजाविधी पुर्ण करीत आहे. त्यानंतर शिखरावरील पुजाविधी पुर्ण झाल्यानंतर बहुतांश भाविक गाय किवाडी या देवस्थानाची देखील दर्शन घेत आहे. खर्या अर्थाने अस्तंबा शिखरावरील पुजा जगातील रोगराईपासून सुटका, अन्नधान्याच्या वाढीसाठी शिवाय संपूर्ण समृद्धीसाठी केली जात असल्याने अस्तंबा देवस्थानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिखराकडून घराकडे परतणारा भाविक सोबत नेलेले वस्तू परत घराकडे नेत आहे. डोगोअं दिवालीच्या पुजेनंतर पुन्हा प्रत्येक आदिवासी कुटुंबात विधिवत नव्या अन्नाची पुजा पुर्ण केली जात आहे. या पुजाविधीला आठहिवटी म्हटले जात आहे. या संपूर्ण विधी पुर्ण केल्याशिवाय खरीप हंगामात पिकवलेल्या पिकांची मळणी केली जात नाही. त्यामुळे पिके परिपक्व झाली असली तरी त्यांची केवळ कापणीच सुरु आहे. कापणी पुर्ण झालेली पिके पारंपारिक खळ्याच्या ओट्यावर रचून ठेवली आहे. काही कुटुंबात या पुजाविधी आटोक्यात आणण्यासाठी आदिवासी बाधवांची धावपड सुरू आहे.

# नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत दिवाळी स्नेह संमेलन




**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणा-या लोकोपयोगी सेवा सुविधांची, प्रकल्पांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे काम प्रसारमाध्यमांमार्फत होत असून नागरिकांच्याही अडी-अडचणी, सूचना यादेखील प्रशासनापर्यंत प्रसारमाध्यमांमार्फत पोहचत असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमे ही नागरिक आणि महापालिका यांच्यामधील अत्यंत महत्वाचा दुवा असून देशातील सर्वात मोठ्या प्रमाणात साज-या होणा-या दिवाळी सणाच्या निमित्ताने माध्यम प्रतिनिधींशी संवाद व्हावा आणि विचारांचे, शुभेच्छांचे आदान-प्रदान व्हावे याकरिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेनुसार दिवाळी स्नेहसंमेलनासारखा उपक्रम नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात अतिशय उत्साहात राबविण्यात आला. यावेळी विविध वृत्तपत्रे व वृत्तचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी, कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी प्रसारमाध्यम प्रतिनिधी व कॅमेरामन यांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा देत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या नावलौकिकात प्रसारमाध्यमांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. इतर शहरांपेक्षा आपले नवी मुंबई शहर वेगळे असून स्वच्छतेप्रमाणेच आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, क्रीडा सुविधा, सांस्कृतिक उपक्रम अशा विविध क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिकेच्या सुरु असलेल्या उल्लेखनीय कामांबद्दल माहिती देत आगामी काळात राबविण्यात येणा-या सुविधा कामांचीही त्यांनी माहिती दिली. नवी मुंबई पर्यटनदृष्ट्या लोकप्रिय शहर व्हावे याकरिता केल्या जात असलेल्या नियोजनाचीही माहिती दिली. यावेळी आयुक्त महोदयांसमवेत अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे, उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, डॉ. अजय गडदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, सहा.आयुक्त श्रीम. अलका महापुरकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या वतीने श्री.विनय म्हात्रे, श्री. दिनेश पाटील, श्री.विनायक पाटील,श्री.संजय पवार.श्री.बाळासाहेब दारकुंडे, श्री.सुधीर शर्मा, श्रीम.अर्चना त्रिपाठी, श्री.काकडे व श्री. मनोज जालनावाला यांनी दिवाळी फराळासह स्नेहसंमेलनाचे आयोजन करुन एक चांगला संवाद माध्यम प्रतिनिधींशी साधल्याबद्दल मनोगते व्यक्त करतांना या संकल्पनेची प्रशंसा केली. यावेळी काही माध्यम प्रतिनिधींसह उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड व महापालिका सचिव श्रीम.चित्रा बाविस्कर यांनी कविता सादर केली. सर्वांच्या एकत्रित सहयोगातून प्रशासन व पत्रकार यामधील दिवाळी स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

# दिवा शहराच्या वाहतूक कोंडीचा फटका मध्य रेल्वेला; अनेक लोकलचा खोळंबा



**दैनिक वादळ वार्ता । ठाणे**

ठाणे महानगर पालिकेच्या हद्दीतील वाढत्या लोकसंख्येचे शहर असलेल्या दिवा शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढू लागली आहे. साधारण दिवा शहराची चार ते पाच लाखांच्या पुढे लोकसंख्या झाल्याने वाहनांची वर्दळ देखील वाढू लागली आहे तसेच दिवा रेल्वे स्थानक पूर्व परिसरात दिवाळीमुळे लागलेले स्टॉल, नागरिकांची खरेदी, शेकडो रिक्षासह अनेक वाहनांची गर्दी, रखडलेला उड्डाणपूल, फेरीवाले परिणामी दिवा शहरात वाहतूक कोंडी वाढू लागली असल्याने याचा फटका अनेकदा मध्य रेल्वेच्या रेल्वे वाहतूकीला पडत आहे. आज दुपारी १२-३० ते १ वाजता दरम्यान दिवा रेल्वे स्थानकाजवळ पूर्व-पश्चिम जाण्यास रेल्वे फाटकाजवळ वाहतूक कोंडी झाली तर साबेगावाकडे येणाऱ्या -जाणाऱ्या वाहनांमुळे दिवा रेल्वे फाटक उघडले गेल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडीमुळे रेल्वे फाटक लवकर बंद करण्यास उशीर झाल्याने काही काळ मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती परिणामी अनेक लोकलंच्या रांगा लागल्या होत्या त्यामुळे रेल्वे सुरक्षा बलास फाटक बंद अनेक अडचणी निर्माण झाल्याने रेल्वे फाटक वेळेपेक्षा जास्त काळ बंद सुरु राहते याचाच फटका मध्य रेल्वेच्या वेळापत्रकावर होत असताना दिसून येत आहे.दिवा रेल्वे स्थानकाचे रेल्वे फाटक कायम स्वरूपी बंद करण्यासाठी ३ मार्च २०१९ मध्ये भूमीपूजन झालेले उड्डाणपुलाचे काम १८ महिन्यात पूर्ण होणारा पूल सन २०२५ सरत आले असूनही उड्डाणपूलाचे काम संथ गतीने सुरु असल्याने प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रेल्वे फाटक कायम स्वरूपी बंद होऊ शकत नाही आणि याचाच फटका मध्य रेल्वेच्या वेळापत्रकावर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सदर उड्डाणपूल तात्काळ पूर्ण करण्याची मागणी दिवेकरांनी केली आहे.

# शेतकऱ्यांसाठी यंदा काळी दिवाळी साजरी करणार:शरद पवारांच्या राष्ट्रवादीची घोषणा



**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार शेतकऱ्यांना मोकळ्या हाताने मदत करत नाही. त्यामुळे आमच्या पक्षाने शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी यंदा काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी सरकारवर निशाणा साधताना केली. दिवाळीनंतर आपण या प्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.शरद पवार यांनी शुक्रवारी सकाळी बारामतीमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सरकारची शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करण्याची तयार नसल्यामुळे काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ आल्याचा आरोप केला. ते म्हणाले, मराठवाड्यासह संपूर्ण राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यानंतरही हे सरकार शेतकऱ्यांना मोकआळ्या हाताने मदत करण्यात कुचराई करत आहे. त्यामुळे आमच्या पक्षाने राज्यभरात काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. मला या प्रकरणी राजकारण करायचे नाही. पण या सरकारची शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असल्याचे मला वाटते.

पूरग्रस्त भागातील लोकांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज आहे. त्यानुसार आम्ही सरकारकडे तशी तयारी दाखवली. पण शेतकरी व पूरग्रस्तांना मोकळ्या हातांनी मदत करण्याची तयारी सरकारची अद्यापही दिसून आली नाही. त्यामुळे आम्ही यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला.

शरद पवार पुढे म्हणाले, मागील महिनाभर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. काही ठिकाणी पूर व काही ठिकाणी महापूर आला. त्यात शेती पूर्णतः उद्ध्वस्त झाली. अनेक ठिकाणची जमीन खरडून गेली आहे. त्यामुळे शेतकरी अस्वस्थ आहे. त्यांच्यासाठी शेती हेच त्यांचे सर्वस्व आहे. त्यांचे हेच सर्वस्व पुरात वाहून गेले. तो कोणत्या मनस्थितीत दिवाळी साजरी करणार? म्हणून त्यांच्या दुःखात आमच्या संघटनेने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. संकटे येतच राहतात. पण सरकारने संकटात सापडलेल्या लोकांना त्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यानुसार सराकरने पूरग्रस्तांसाठी काही मदत जाहीर केली. पण नुकसानीचे स्वरूप पाहिले तर ही मदत फार तोकडी आहे.या मदतीमुळे शेतकरी पुन्हा उभा राहील असे वाटत नाही. त्यामुळे संकटग्रस्त शेतकरी सरकारवर नाराज आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, हे जे काही घडत आहे, ते अत्यंत दुःखद आहे. याहून अधिक मला काहीही बोलायचे नाही, असे शरद पवार म्हणाले.

# माणुसकीच्या भिंती कार्यक्रमां मध्ये झाले माणुसकीचे दर्शन

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

जे हवं आहे ते घेऊन जा जे नको आहे ते देऊन जा या माणुसकीचे भिंत या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच लोअर परळ येथे करण्यात आले होते. या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमांमध्ये विभागातील गरजू नागरिकांनी त्यांचे घरातील जे नको असेल ते सामान या ठिकाणी दान केले. त्याचप्रमाणे विभागातील गरजू नागरिकांनी आपल्याला जे हवे असलेले सामान या ठिकाणावरून मोफत घेऊन गेले. यामध्ये कपडे, भांडी, सायकली, लहान मुलांची खेळणी, चप्पल, शुज यासारखे अनेक गरजू उपयोगी वस्तूंचे या कार्यक्रमात दान करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये कामगार नेते निशिकांत शिंदे यांनी विभागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीसाठी विविध चेकचे वाटप शिवसेना सचिव, समाजसेवक सुधीर





साळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे म्हणजे त्यांच्या भविष्याला योगदान देणे. निशिकांत शिंदे हे नेहमीच विभागात सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतात. परंतु त्यांनी यावेळी फार मोठा असा विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. त्यांना या ठिकाणी विनंती करतो की यापुढे देखील त्यांनी अशा प्रकारे आपली समाजसेवा सुरू ठेवावी आणि तळागाळातील जनतेला मदत करावी अशी माहिती शिवसेना सचिव समाजसेवक सुधीर साळवी यांनी दिली. आम्ही विभागात विविध प्रकारचे सामाजिक कार्य करत असतो. त्यात विद्यार्थ्यांना दरवर्षी आम्ही चेकचे वाटप करत असतो. आम्ही ही गरिबीतून वर आलेलो असून आम्हाला त्याची जाणीव आहे. याच जाणिवेतून आम्ही समाज कार्य करत असतो आणि यापुढे देखील करणार असल्याची माहिती कामगार नेते निशिकांत शिंदे यांनी दिली.

# कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था पागोटेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटप

**उरण । दैनिक वादळ वार्ता**

सन २०२२ साली सामाजिक कार्य करण्याच्या हेतूने कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेची स्थापना झाली. जेव्हा पासून या संस्थेची स्थापना झाली तेव्हा पासून अनेक विविध लोकोपयोगी उपक्रम या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आले. या संस्थेने गोरगरिबांना नेहमी मदतीचा हात दिला आहे.अशा या कुणाल पाटील यूवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दिवाळी सण जवळ आला की विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळाचे वाटप केले जाते. दरवर्षी प्रमाणे यंदाही संस्थेच्या माध्यमातून पागोटे ग्रामपंचायतचे कार्यसम्राट सरपंच तथा कुणाल पाटील यूवा सामाजिक संस्थेचे संस्थापक सामाजिक कार्यकर्ते कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील पागोटे गावातील जिल्हा परिषद शाळा,नवघर जिल्हा परिषद शाळा,कुंडेगाव जि.प.शाळा, उरण शहरातील बोरी येथे असलेल्या स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सिबर्ड उरण विशेष मुलांची शाळा येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व



दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटपाचे यंदाचे हे ३ रे वर्ष आहे. शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. समाजातील उपेक्षित, वंचित समाजाची दिवाळी आनंदात जावी. त्यांच्या या सुख दुःखात सहभागी होउन त्यांच्या सोबत दिवाळी सण आनंदात साजरा करता यावी या उद्देशाने सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षी विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटप करण्यात येत असल्याची माहिती कार्यसम्राट सरपंच कुणाल पाटील (संस्थापक कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था पागोटे ) यांनी दिली. या कार्यक्रम प्रसंगी कार्यसम्राट सरपंच कुणाल पाटील,संस्थेचे पदाधिकारी महेश पाटील, विनय पाटील, प्रणय पाटील, ऋषिकेश म्हात्रे, प्रथम तांडेल, ऋषिकेश पाटील, नकुल पाटील, अमित पाटील, रोशन म्हात्रे, दर्शन म्हात्रे, आकाश म्हात्रे, सुमित पाटील, राज पाटील (फोटोग्राफर ), ज्योतेश पाटील, आतिष पाटील यांच्यासह संस्थेचे अन्य पदाधिकारी सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे उत्तम नियोजन व उत्तम आयोजन असल्याने विविध शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी वर्गांनी कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या कार्याचे, पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# नंदुरबार हादरले! चांदशैली घाटात ‘काळाचा घाला’

## ब्रेक फेल होऊन पिकअप दरीत कोसळल्याने ८ भाविकांचा मृत्यू, १५ गंभीर जखमी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

अस्तंबा यात्रेहून परतणाऱ्या भाविकांवर धनत्रयोदशीच्या (शनिवार) शुभदिनी काळाने घाला घातला. तळोदा–धडगाव रस्त्यावरील चांदशैली घाटात ब्रेक फेल झाल्याने भाविकांना घेऊन जाणारा छोटा हत्ती कॅरी टेम्पो, एम.एच. ३९ एबी २८०२ वेगाने दरीत कोसळला. हा अपघात इतका भीषण होता की, यात आठ भाविकांचा जागीच मृत्यू झाला असून, १५ हून अधिक भाविक गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

ब्रेक फेल झाले आणि टेम्पो दरीत कोसळला

गेल्या दोन दिवसांपासून अस्तंबा यात्रेला भाविकांची मोठी गर्दी होती. दिनांक १८ रोजी सकाळी ठीक १०. ३० वाजेच्या दरम्यान, यात्रा पूर्ण करून ३० ते ३५ भाविक छोटा हत्ती वाहनाने खाली उतरत होते. चांदशैली घाटातून खाली उतरत असताना अचानक वाहनाचे ब्रेक निकामी झाले आणि चालकाचा ताबा सुटला. वेगात असलेले हे वाहन पलटी होऊन खोल दरीत कोसळले. वाहनाचा चक्काचूर झाल्याने आणि अनेक भाविक चिरडले गेल्याने जीवितहानी मोठ्या प्रमाणात झाली.घटनेची माहिती मिळताच तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. अपघातात ८





भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर १५ हून अधिक भाविक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर तळोदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये कोळदे, घोटाने, बाळदा, तळोदा आणि समशेरपूर परिसरातील भाविकांचा समावेश आहे.

अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये १.संजय भिलाव रा. नंदुरबार
२.भुषण राजेंद्र गोसावी रा.घोटाणे ३. पवन गुलाब मिस्तरी रा.घोटाणे ४. बापु छगन धनगर रा. घोटाणे
५. चेतन पवन पाटील रा.घोटाणे
६.योगेश लक्ष्मण ठाकरे. कोरीट
७.राहुल गुलाब मिस्त्री रा.घोटाणे ८. हिरालाल जगन भिन.रा.कोरीट.

जखमी व्यक्तींची नावे:–
१.क्रिष्णा अशोक मिस्तरी रा. घोटाणे
२.रविराज ठाकरे रा. बालदा
३.कृष्णा पाडवी रा.बालदा
४ परविन संजय वाघ
५ अर्जुन चुनीलाल सोनवणे रा. तळोदा
६ राहुन राजसिंग ठाकरे रा. समशेरपुर
७ दिपक हिम्मत गोसावी.रा.घोटाणे
८ सागर गायकवाड रा.तळोदा.
९ सागर राजु ठाकरे. समशेरपुर १० नमन मुकेश गायकवाड.रा.तळोदा
११. जयेश महेंद्र मिस्तरी रा. घोटाणे
१२. गणेश सुभाष गोसावी रा.घोटाणे
१३. दिनेश सतीलाल ठाकरे रा. कोळदा
१४. बापु खंडू पाटील.घोटाणे
१५. कार्तिक योगेश थोरात हे होत.


या दुर्घटनेनंतर तातडीने मदतकार्य सुरू झाले. रुग्णवाहिका चालक अण्णा पाटील, रोहन गुरव आणि पप्पू गुरव यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता जखमींना दरीतून बाहेर काढून रुग्णालयात पोहोचवले. तसेच, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश वळवी आणि रुग्ण सहायता केंद्राचे सदस्य योगेश मराठे, केसरसिंग क्षत्रिय, चेतन शर्मा, विनोद माळी, अमन जोहरी, रोहन माळी, मुकेश बिरारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्यात सक्रिय सहभाग घेतला.

या घटनेची माहिती मिळताच माजी आदिवासी विकास मंत्री तथा आमदार विजयकुमार गावित यांनी तळोदा उपजिल्हा रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली व त्यांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले. तसेच, आमदार राजेश पाडवी यांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातूनही मदतकार्य राबविण्यात आले. जखमींना योग्य उपचार मिळतील याकडे लक्ष देण्याचे आश्वासन गावित यांनी दिले आहे.

धनत्रयोदशीच्या दिवशी ही दुर्घटना घडल्याने मृतांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलीस या घटनेची पुढील कार्यवाही करत आहेत.

## गणपतराव राऊत यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक माजी सरपंच इंजि गणपतराव (भाऊ )रंगनाथ राऊत वय ८१ वर्ष यांचे पुणे येथे(दि १८) शनिवार रोजी उपचारादरम्यान निधन झाले.तत्कालीन सरपंच असताना आनंदगावला एक गाव एक पानवठा पुरस्कार प्राप्त झाला होता. भाऊ कंत्राटदार म्हणूनही ते सर्वपरिचित होते. रविवारी (दि १९)सकाळी नऊ वाजता पाथरा येथील शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले नानासाहेब, बाळासाहेब,दिलीप व एक मुलगी,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## स्मृतीशेष श्रावणदादा जगतकर यांच्या अस्थींचे शेतीमध्ये बोधीवृक्ष लावून विसर्जन

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक स्मृतीशेष श्रावणदादा जगतकर यांचे नुकतेच निधन झाले होते.त्यांच्या अस्थींचे आज दिनांक १८ रोजी शेतामध्ये बोधीवृक्षाचे रोप लावून तिथे विसर्जन केले.भीमनगर येथील श्रावणदादा जगतकर यांचे नुकतेच दु:खद निधन झाले होते.त्यांच्यावर काल शांतीवन स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले होते.फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते.पत्रकार बालाजी जगतकर यांचे ते वडील होते.त्यांच्या अस्थींचे आज त्यांच्या शेतात बोधीवृक्ष लावून त्या ठिकाणी अस्थींचे विसर्जन केले.यावेळी जगतकर कुटुंबिय उपस्थित होते.



## पिंपर्डे गावाजवळ दोन दुचाकींचा समोरा समोर अपघात, दोन जखमी तर एक ठार

दैनिक वादळ वार्ता
**वडाळी । लाला चव्हाण**

गावकऱ्यांच्या तत्परतेने १०८ द्वारे जखमींना उपचारासाठी तात्काळ रवाना.शहादा मंदाना रस्त्यावर पिंपर्डे गावाजवळ आज संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास दोन दुचाकींचा भीषण अपघात झाला.. या अपघातात दोन जण गंभीर जखमी तर एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू.. पिंपर्डे व असलोद गावाच्या नागरिकांच्या तत्परतेमुळे १०८ रुग्णवाहिकेद्वारे सर्व जखमींना तात्काळ मोहिदा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे..मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव येथील दौलत मक्कन चव्हाण व राकेश चंद्रसिंग पावरा हे दोघे शहादाहुन मिस्तरी काम करून आपल्या दुचाकी क्रमांक एमएच ४१ एसी १६२५ वरून



वडगावकडे जात होते..त्याच वेळी मलगाव येथील वसंत राजू पावरा हा आपल्या दुचाकी क्रमांक जेजे २३ जे ९७०४ वरून शहादा दिशेने जात असताना पिंपर्डे गावाजवळ दोन्ही दुचाकींचा समोरासमोर जोरदार धडक झाली..

धडकेचा आवाज ऐकताच पिंपर्डे व असलोद येथील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. स्थानिकांनी १०८ रुग्णवाहिकेला त्वरित कळवून सर्व जखमींना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय मोहिदा येथे रवाना केले. असता वडगाव येथील दौलत मक्कन पावरा वय २८ वर्ष यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असून त्याच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले व चार वर्षाची मुलगी आहे.. दोघे गंभीर जखमी झाले आहेत.घटनेची माहिती मिळताच असलोंद पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन घटनेची सविस्तर माहिती घेत आहेत. या अपघातामुळे काही काळ रस्त्यावर वाहतूकही खोळंबली होती..

### शासकीय सेवेतील आदर्श अधिकारी पूरस्थितीत

## मंडळ अधिकारी अशोक दराडे व तलाठी भरणे यांचे उल्लेखनीय कार्य

दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा । प्रतिनिधी**

शासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण म्हणजे मंडळ अधिकारी अशोक दराडे व तलाठी राहुल भरणे यांचे कार्य. संकटाच्या काळात जनतेच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत या दोन्ही अधिकाऱ्यांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि जबाबदार वृत्ती आदर्श ठरली आहे.पूरग्रस्त भागात घराघरात जाऊन परिस्थितीचा आढावा घेणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे, अन्न, पाणी व आरोग्य सेवांची सोय करून देणे तसेच शासनाच्या मदतीचा प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत तात्काळ पोहोच होण्यासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.



तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पातळीवर आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत राहिली. प्रशासन, पोलिस, ग्रामपंचायत व स्वयंसेवक यांच्या संयुक्त समन्वयातून पूरग्रस्त भागात वेळेत मदत पोहोचवून जनतेचा विश्वास जिंकण्यात ते यशस्वी ठरले.ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनीही अशोक दराडे व राहुल भरणे यांच्या प्रामाणिक कार्यनिष्ठा, जनसेवा भाव आणि शासकीय कार्यक्षमतेचे मनापासून कौतुक केले आहे. अशा अधिकारीवर्गामुळेच शासन खर्या अर्थाने जनतेच्या सेवेत कार्यरत आहे, असा प्रतिसाद स्थानिकांनी दिला.

## साने गुरुजी निवासी विद्यालयाचे सहा संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र

दैनिक वादळ वार्ता
**केज प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाअधिकारी कार्यालय बीड,जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय बेसबॉल व सॉफ्टबॉल स्पर्धा दिनांक १८–१० २०२५ रोजी क्रीडा संकुल बीड येथे संपन्न झाल्या. यात साने गुरुजी निवासी विद्यालयाचे एकूण सहा संघ जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आहे सदर संघ विभाग स्तरासाठी बीड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे.यात १४ वर्ष मुले,मुली बेसबॉल,सॉफ्टबॉल प्रथम,१७ वर्ष मुले,मुली बेसबॉल,सॉफ्टबॉल प्रथम,१९ वर्ष बेसबॉल, सॉफ्टबॉल प्रथम या ०६ संघाने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून आपल्या यशाची परंपरा




कायम ठेवली आहे.सदर ६ संघ परभणी व छत्रपती संभाजीनगर येथेहोणाऱ्या विभागीय स्पर्धेचे बीड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे. या संघास क्रीडा मार्गदर्शिका प्राचार्य डॉ. कविता कराड,क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर,क्रीडासहाय्यक श्री.घुले सर,बेसबॉलचे क्रीडा मार्गदर्शक श्री. रेवन्नाथ शेलार सर जिल्हा क्रीडा संकुल बीड, सॉफ्टबॉलचे मार्गदर्शक राठोड सर जिल्हा क्रीडा संकुल बीड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सदर शाळेचे संघ गेली दहा वर्षापासून सातत्याने राज्यस्तरावर प्राविण्य प्राप्त करत असून राष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडू आपला नावलौकिक करत आहेत याबद्दल बीडजिल्हा क्रीडा कार्यालयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर सर,बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. सुनील थोरात सर, अनिकेत काळे सर तालुका क्रीडा अधिकारी, जितू आरक सर,मंगेश सर व संस्थेचे अध्यक्ष ड. उद्धवराव कराड,कापसे सर सर्व शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या आहेत.

# चंद्रपूरची धम्मभूमी समतेचा जाज्वल्य दीप–आ.किशोर जोरगेवार

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या भूमीवरून समतेचा, करुणेचा आणि प्रज्ञेचा संदेश संपूर्ण मानवजात पर्यंत पोहोचला, त्या भूमीवर आज उभा राहून अतिशय आनंद व अभिमान वाटतो. या पवित्र स्थळाचा विकास करण्याचा संकल्प आपण केला आहे. ५७ कोटी रुपयांतून येथे सर्व सोयी–सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. चंद्रपूरची धम्मभूमी म्हणजे समतेचा जाज्वल्य दीप असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटी, दीक्षाभूमी, चंद्रपूर यांच्या वतीने ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभ दीक्षाभूमी येथे उत्साह आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भूमीवरून दिलेला धम्माचा संदेश हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण मानवजातीसाठी आहे. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समता, बंधुता आणि न्याय या त्रिसूत्रीवर आधारित समाजव्यवस्था उभी केली. त्या विचारांमुळे आज देशात लोकशाही बळकट झाली आहे. आजचा हा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन म्हणजे बाबासाहेबांचा मार्ग आत्मसन्मानाचा, तर्काचा आणि परिवर्तनाचा आहे हे स्मरण ठेवण्याचा दिवस आहे. त्यांनी दाखवून दिलं की, शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तीन मंत्रांमुळे कोणताही समाज अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करू शकतो. चंद्रपूर हे बाबासाहेबांच्या कार्याशी नाळ जोडलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. नागपूरनंतर चंद्रपूर येथे धम्मचक्र अनुप्रवर्तनाचा कार्यक्रम झाला, ही आपल्या जिल्ह्याची अभिमानाची बाब असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077